

। न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिहं विद्यते ।

सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# श्री पंचम खेमराज महाविद्यालय व राजमाता सत्वशीलादेवी भोंसले कनिष्ठ महाविद्यालय, सावंतवाडी



## कला, विज्ञान, वाणिज्य व माहिती तंत्रज्ञान

● आय. टी. विषयाची सुविधा ●

● लँग्वेज लॅब ची सुविधा ● ● प्रशस्त ग्रंथालय ●

# माहितीपुस्तिका २०२२-२३



**Vision** - Shri Pancham Khemraj Mahavidyalaya is to be developed into Shri Pancham Khemraj University.

**Mission** - To make all round development of people of rural and remote area mainly from south konkan (Western Ghats i.e. Sahyadri) especially in the economical, cultural, ethical and industrial aspects.

# सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ

## कार्यकारी मंडळ



हिज हायनेस लेफ्ट. कर्नल स्व. श्रीमंत
शिवरामराजे भोंसले (राजेसाहेब)
संस्थापक - अध्यक्ष



हर हायनेस स्व. श्रीमंत
सत्वशीलादेवी भोंसले (राजमाता)
आमचे प्रेरणास्थान



हिज हायनेस श्रीमंत
खेमसावंत भोंसले (राजेसाहेब)
अध्यक्ष



हर हायनेस श्रीमंत
सौ. शुभदादेवी भोंसले (राणीसाहेब)
चेअरमन



युवराज
लखम खेमसावंत भोंसले
कार्यकारी विश्वस्त



युवराज्ञी
सौ. श्रद्धाराजे लखमसावंत भोंसले
विश्वस्त



युवराज्ञी
उर्वशीराजे भोंसले
विश्वस्त

संस्थापक - अध्यक्ष - हि. हा. लेफ्ट. कर्नल स्व. श्रीमंत शिवरामराजे भोंसले (राजेसाहेब)

आमचे प्रेरणा स्थान- ह. हा. स्व. श्रीमंत सत्वशीलादेवी भोंसले (राजमाता)

तहह्यात अध्यक्ष व संस्थेचे विश्वस्त - हि. हा. श्रीमंत खेमसावंत भोंसले (राजेसाहेब)

चेअरमन - ह. हा. श्रीमंत सौ. शुभदादेवी भोंसले (राणीसाहेब)

कार्यकारी विश्वस्त - युवराज लखम खेमसावंत भोंसले

विश्वस्त - युवराज्ञी सौ. श्रद्धाराजे लखमसावंत भोंसले

विश्वस्त - युवराज्ञी उर्वशीराजे खेमसावंत भोंसले

पदसिद्ध सदस्य - प्राचार्य - श्री. पं. खे. महाविद्यालय, सावंतवाडी

। न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिंह विद्यते ।

सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# श्री पंचम खेमराज महाविद्यालय व राजमाता सत्वशीलादेवी भोंसले कनिष्ठ महाविद्यालय, सावंतवाडी

## कला,वाणिज्य,विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान

सन २०२२-२३

### ❊ आमची वैशिष्ट्ये ❊

- सीईटी परीक्षा मार्गदर्शन
- आय.टी.विषयाची सुविधा
- सुसज्ज प्रयोगशाळा
- उत्कृष्ठ निकालाची परंपरा
- अद्ययावत ग्रंथालय
- माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा
- उत्तम शिक्षक वृंद

### * कार्यालयीन वेळ *

कार्यालयीन कामकाजाची वेळ : सकाळी ९.५० ते ५.३०

पैशाची देवघेव वेळ : सकाळी १०.३० ते दुपारी १.३०

## ■ पुण्यश्लोक बापूसाहेब महाराजांचे शिक्षण विषयक विचारधन

श्री पंचम खेमराज उर्फ बापू साहेब महाराज यांचा जन्म २० ऑगस्ट १८९७ मध्ये ब्रिटीश राजवटीत झाला. ब्रिटीशांकडून राज्याधिकार मिळविण्यासाठी महाराजांना झगडाव लागले. वैराग्यशीलता, स्थितप्रज्ञता, प्रजाहितदक्षता या त्रिसुत्रीय तत्वाचा उपयोग महाराजानी राजकारभारात केला होता. त्यामुळेच म. गांधीजींनी संस्थानाच्या भेटी प्रसंगी बापूसाहेब महाराजांचा कारभार पाहून संस्थानाचा उल्लेख 'रामराज्य' आणि बापू साहेब महाराजांचे वर्णन रामराजा असे केले होते. सावंतवाडी संस्थान उत्पन्नाने कमी असूनही त्या उत्पन्नातील बराचसा भाग तेव्हा शिक्षणावर खर्च होत होता. संस्थानाला कै. श्रीराम उर्फ रावसाहेब, कै. श्री. पंचम खेमराज उर्फ बापूसाहेब महाराज, कै. राणी पार्वतीदेवी यांच्या महान आचार विचारांचे नेतृत्व लाभले.

## ■ सर्व सुधारणेचा पाया-शिक्षण

सर्व विकासाचा पाया म्हणजे शिक्षण होय. ही गोष्ट बापूसाहेब महाराजांना पूर्णपणे पटली होती.त्यामुळे शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार शक्य तितका करणे हे त्यानी आपले परम कर्तव्य मानले. शिक्षण प्रसारासाठी त्यांनी आपल्या कारकिर्दीत खूप प्रयत्न केले. संस्थान काळात सावंतवाडी येथे हायस्कूल होते.त्याला फार मोठी परंपरा लाभली होती. शिक्षण केवळ पुस्तकी न राहता सर्वांगीण विकास साधणारे असावे,यासाठी औद्योगिक शाळांचा विकास करण्यात आला. सुतारकामाबरोबर विणकाम, मुद्रणकाम, हातमाग चालवणे, सुतकातण्याचे काम, शेती शिक्षण वगैरे धंदे शिक्षणालाही प्रोत्साहन दिले. हायस्कूलातील विद्यार्थ्यांनी एखाद्या तरी धंद्याचे शिक्षण घ्यावे अशी सक्ती देखील त्या काळी करण्यात आली होती.

खेळांचे वार्षिक सामने घडवून आणणे, बालवीर चळवळ,स्त्री शिक्षणाला उत्तेजन मिळावे म्हणून इंग्रजी,मराठी शाळांतील मुलींना मोफत शिक्षणाची सोय, अस्पृशांचा मागासलेपणा लक्षात घेवून त्यांना शिक्षणच काय परंतु शिक्षणाचे साहित्य मोफत देणे,साक्षरता प्रसारक संघ स्थापून त्यांना जोराने चालना देणे, शिक्षणाचा झालेला प्रसार टीकावा म्हणून दहा फिरत्या वाचनालयांची योजना,चांगले शिक्षक

मिळावेत यासाठी नॉमर्ल क्लास सुरू करून शिक्षकांना त्याद्वारे प्रशिक्षित करणे.या गोष्टी शिक्षणाच्या प्रगतीच्या नव्हे तर कै.बापूसाहेबांच्या दूरदृष्टीच्या निदर्शक आहेत.

**■ मडुरा इंग्लीश स्कूलच्या इमारत अनावरण प्रसंगी केलेले ऐतिहासिक भाषण**

"सदरहू शाळा सुरू केल्यावर आपले कर्तव्य संपले असे न मानता श्री वालावलकर हे या शाळेच्या कामाकडे व प्रगतीकडे विशेष लक्ष देत आहेत.ही फार समाधानाची गोष्ट आहे शाळेतील मुलांना खेळण्यासाठी क्रिकेट व फुटबॉल या खेळाची साधने त्यांनीच घेऊन दिली आहेत.हल्ली येथील शाळेत बालवीर संस्था सुरू झाली त्यावेळी गरीब मुलांस त्यांनी कपड्यासाठी मदत केली आहे.यावरून असे दिसून येते की,मुलांच्या शारीरिक शिक्षणाकडे त्यांचे लक्ष आहे. हिंदुस्थानातील शिक्षण पद्धतीतील मोठा दोष म्हटला म्हणजे ते अगदी एकांगी व पुस्तकी असते .मुलांच्या शारीरिक व नैतिक विकासाकडे आजपर्यंत जवळ जवळ पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले होते;परंतु हल्ली काही वर्षे या प्रश्नाकडे लोकांचे लंक्ष जात आहे ही आनंदाची गोष्ट आहे."

" बालवीर म्हणजे स्काऊटबॉय या चळवळीपासूनही राष्ट्राचे फार मोठे कल्याण होण्यासारखे आहे. या चळवळीमुळे लहानवयापासून मुलांना शिस्तीने व एकजुटीने वागण्याची सवय लागून ते स्वावलंबी होण्यास मदत होते या त्यांच्या ठिकाणी उपजत असलेल्या देशाभिमान,भुतदया वगैरे सद्गुणांचा विकास होतो. त्यामुळे ते चांगले नागरिक होतील यात शंका नाही. स्काऊटबॉय शिक्षकांनी या चळवळीच्या मूळ हेतुकडे लक्ष देउन मुलांस शिक्षण देताना त्यांच्या मनावर वरील व इतर सद्गुणांचे महत्व ठसविण्याकडे व त्यांच्या नैतिक वाढीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे." "विद्यादान हे सर्व दानात श्रेष्ठ आहे. असे आमचा धर्म सांगतो व या प्रकारच्या दानाचे महत्व ओळखू लागले आहेत.हे राष्ट्रच्या उद्धाराचे सुचिन्ह आहे. विद्या हा राष्ट्राच्या उन्नतीचा पाया आहे ऐहिक कल्याण सोडून देऊन पारमार्थिक कल्याणाकडे लक्ष दिले तरी अज्ञानाचा नाश होऊन ज्ञान प्राप्त होणे आवश्यक असल्यामुळे विद्यादान करण्याचे पुण्य विशेष आहे ."

" झटून अभ्यास करणे हे शाळेतील विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे.अभ्यास करताना त्यांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे.क्रिकेट,खो-खो,आट्यापाट्या वगैरे खेळ खेळणे किंवा इतर काहीतरी व्यायाम नियमितपणे करणे हे त्यांचे कर्तव्य आहे.त्यांच्या आईबापानी व शिक्षकांनीही ते नियमित व्यायाम करतात की नाही यावर लक्ष ठेवले पाहिजे. "

## ■ शिक्षण प्रचार

असा प्रगत दृष्टीकोन ठेवल्यामुळे त्या काळात या भागामध्ये शिक्षणाचा पध्दतशीर प्रचार व प्रसार झाला.संस्थानातील प्रत्येक खेड्यात मराठी चौथीपर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन झाल्या माध्यमिक शिक्षणाच्या प्रचारासाठी त्यांनी खुप प्रयत्न केले होते. कुडाळ-आरोंदा वगैरे ठिकाणी माध्यमिक शाळा सुरू झाल्या, तसेच संस्थानातील मोठ्या वस्तीच्या गावातून इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंत शिक्षण देणाऱ्या अँग्लोव्हर्नाक्युलर शाळा सुरू करण्यात आल्या. सावंतवाडीत मुलींसाठी मोफत हायस्कूल सुरू झाले. त्यामुळे त्यावेळी संस्थानच्या भागातील साक्षरतेचे प्रमाण शेकडा १७% पर्यंत पोचले होते. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत केली होती.

## महाविद्यालयाची वाटचाल

## ■ राणी पार्वतीदेवी कॉलेज

सावंतवाडीचे थोर राजे श्रीमंत बापूसाहेब महाराज यांचे दिनांक ४ जुलै १९३७
साली पुणे मुक्कामी दुर्दैवाने अपघाती निधन झाले .त्यावेळी युवराज शिवराम राजे भोंसले अवघे १० वर्षाचे असल्यामुळे संस्थानाचा राज्यकारभार चालविण्यासाठी कै.राजमाता पार्वतीदेवी या कै.श्रीमंत बापूसाहेब महाराजांच्या इच्छेनुसार सर्वाधिकार संपन्न रिजंट झाल्या व त्यांनी कै.बापुसाहेब महाराजांच्या ध्येयधोरणानुसार राज्यकारभार चालविण्याचे ठरविले.

आपल्या राज्यात शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि आपल्या संस्थानातील मुलांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी असे कै.बापूसाहेब महाराजांना सतत वाटत असल्यामुळे राजमाता पार्वतीदेवी यांच्या प्रेरणेने सावंतवाडीत १९४५ साली

**राणी पार्वतीदेवी कॉलेज सुरू झाले,** परंतु काही आर्थिक अडचणीमुळे या कॉलेजचे स्थलांतर बेळगाव येथे करणे भाग पडले म्हणून आज बेळगावातील ख्यातनाम राणी पार्वतीदेवी कॉलेज हे बेळगांवला सावंतवाडीने दिलेली भेट आहे असे आम्हा सावंतवाडीकरांना सांगता येते.

## ■ सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ

सन १९४७ मध्ये भारतातील इतर संस्थानां प्रमाणे सावंतवाडी संस्थानचेही भारतीय संघराज्यात विलिनीकरण झाले.स्वातंत्र्योत्तर काळात प्रगतीचा वेग चौफेर वाढला.लोकांच्या आशा-आकांक्षा उंचावल्या.शिक्षणाची वाढती मागणी पुढे येऊ लागली. अशा वेळी सावंतवाडीत उच्च शिक्षणाची गरज ही तीव्रतेने जाणवू लागली असल्यास नवल नाही.

उच्च शिक्षणांची सोय करू शकेल अशी एक शिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला व श्रीमंत शिवरामराजे यांची एक सदस्य समिती या निर्णयाची पूर्तता करण्यासाठी नियुक्त करण्यात आली. त्यांच्या प्रेरणेतून सन १९६० साली दक्षिण रत्नागिरी जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ, या नावाने एक शिक्षण संस्था स्थापन करण्यात आली. दक्षिण रत्नागिरीत देवगड ,मालवण,वेंगुर्ला,कणकवली,कुडाळ व वैभववाडी या भागातील हुशार पण गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे हाच उद्‌देश या संस्थेने ठेवला होता.

## ■ सत्यविलास पॅलेस

शिक्षण संस्था सुरू करताना तिच्यासाठी उपयुक्त इमारतीचा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा दक्षिण रत्नागिरी जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार श्रीमंत स्व. शिवरामराजे भोंसले यांच्या औदार्यामुळे त्यांचा सत्यविलास पॅलेस संस्थेस लाभला.फक्त पॅलेस देऊन ते थांबले नाहीत तर त्याच्या सभोवताली असलेली सारी जमीन,झाडे,९९९ वर्षाच्या कराराने नाममात्र भाड्याने संस्थेला त्यांनी दिली.त्यामुळे संस्थेला आपल्या वाढत्या व्यापाबरोबर नवनव्या इमारतीही उभ्या करता आल्या.

अनेक उदार व्यक्ती पुढे आल्या आणि त्यांनी दिलेल्या भरघोस देणग्यामुळे

या इमारती उभारणे शक्य झाले. स्वत: राजेसाहेबांनी आपले आतेभाऊ धारचे कै.महाराज आनंदराव पवार यांच्या कडून मोठी देणगी मिळवून एक भव्य आणि सुंदर हॉल ही बांधून दिला. तसेच कै. वसंतराव शेठ केसरकर,श्री. माधवराव मसुरकर व कै. रामभाऊ परूळेकर यानीही आपल्या उदार देणगीतून संस्थेला इमारती बांधुन दिल्या. या सर्व व्यक्तीनी मंडळास

उपकृत करून ठेवले आहे.

महाविद्यालयाला पुणे विद्यापीठाकडून मान्यता मिळविण्यासाठी मोठी रक्कम ठेव म्हणून विद्यापीठाकडे ठेवणे आवश्यक होते. अल्पावधीत विद्यापीठाची अट वेळेवर पुरी करणे अशक्य होते.संस्थेची तीही अडचण राजेसाहेबांनी रक्कम वेळेवर उपलब्ध करून दूर केली आणि अशा तऱ्हेने महाविद्यालयाचा जीवन प्रवास सुरू झाला. पॅलेस हॉस्टेल सावंतवाडी परिसरातील तसेच दुरच्या भागातून येणाऱ्या गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी श्रीमंत राजेसाहेबांनी आपल्या राजवाड्याच्या परिसरात पॅलेस हॉस्टेल सुरू केले.त्यामुळे अत्यंत गरीब होतकरू विद्यार्थ्यांच्या बोर्डींगचा प्रश्न सुटायला मदत झाली.हॉस्टेलच्या ८-१० वर्षांच्या आयुष्यात येथे राहिलेल्या विद्यार्थ्यांना जेवणखाण, पुस्तके तर मिळालीच पण अभ्यासासाठी शांत प्रसन्न वातावरण व प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना आपले शिक्षण पुरे करण्याची संधी उपलब्ध झाली. या हॉस्टेलमधून बाहेर पडलेले विद्याविभूषित विद्यार्थी सरकारी व खाजगी नोकरीत मोठ्या हुद्द्यावर काम करीत असताना दिसत आहेत.

## ■ शैक्षणिक विश्वस्त-निधी

कालांतराने श्री पंचम खेमराज महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा सतत मिळत राहाव्यात या हेतूने श्री पंचम खेमराज व राणी पार्वतीदेवी शैक्षणिक विश्वस्त निधी स्थापन केला आहे.. संस्थेकडून मिळणारे भाडे याच ट्रस्टकडे जमा होते.या विश्वस्त निधीतून श्री पंचम खेमराज महाविद्यालयात शिकणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना कर्जाऊ शिष्यवृत्ती देण्याची सोय उपलब्ध आहे.

अशा तऱ्हेने आपली संस्था सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या शिक्षणाच्या वाढत्या गरजा भागवण्यासाठी तसेच या भागाला नव्या पिढीच्या शैक्षणिक आशा आकांक्षाची पुर्तता

करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे.

## कै.श्रीमंत शिवरामराजे भोंसले
## संस्थापक अध्यक्ष-सि. जि. शि. प्र. मंडळ,सावंतवाडी

( जन्म -१३ ऑगस्ट १९२७,
स्वर्गवास-१३ जुलै १९९५ )

शिक्षणाचा विकास या दुर्गम परिसरात श्रीमंत शिवरामराजे भोंसले यांनी केला.ते राजेसाहेब म्हणून ओळखले जात.श्री.पंचम खेमराज महाविद्यालय स्थापन करून त्यानी येथिल दुर्गम प्रदेशातील मुला मुलींना शिक्षणाचे नवनवे मार्ग दाखविले. आपल्या पूज्य पित्याच्या नावाने त्यांनी उभे केलेले महाविद्यालय त्यांच्या महान पित्याचे अलौकिक स्मारक बनले आहे.त्यांचबरोबर हे महाविद्यालय म्हणजे कै.राजेसाहेबांच्या लोकोपयुक्त कार्याचे द्योतक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी समाजकारण व राजकारण यामध्ये स्वत:ला झोकून दिले.एक आदर्श,चारित्र्यवान,निरपेक्ष,तसाच निष्कलंक नेता म्हणून ते अखेरपर्यंत ओळखले गेले.पाचवेळा विधानसभेवर निवडून येऊन विविध समित्यांच्या माध्यमातून अनेक लोकपयोगी कामांना त्यांनी चालना दिली.महाराष्ट्र-राज्य हस्तकला महामंडळाचे १९८० ते १९९१ पर्यंत ते अध्यक्ष होते.या काळात महाराष्ट्रातील हस्तकलेचे पुनरूज्जीवन करून त्यांनी तिला जगात सन्मान प्राप्त करून दिला.

एक सिंहासनधिष्ठीत राजा असूनही त्यांनी आपल्या राजेपणाचा वा विव्दत्तेचा गर्व कधीच बाळगला नाही.सामान्यापासून असामान्यापर्यंत ते सर्वांशी अत्यंत सहजतेने आणि साधेपणाने वागून त्यांची विचारपुस करीत. असा थोर, विचारवंत राजा,नेणता,जाणता राजा,सत्वशील राजा,राज माणूस दिनांक १३ जूलै १९९५ रोजी पंचतत्वात विलीन झाले.

## स्वर्गीय राजमाता श्रीमंत सत्वशीलादेवी भोंसले,
## जन्म २ सप्टेंबर १९३५
## स्वर्गवास १८ जुलै २०१८

राजमाता श्रीमंत सत्वशीलादेवी भोंसले या १९८१ पासून आजपर्यंत सातत्याने सिं. जि. शि. प्र. मंडळाच्या कार्याध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या. महाविद्यालयाच्या कार्यक्रमामध्ये रस घेवून त्या जातीनिशी सहभागी होवून मार्गदर्शन करीत. महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्या सतत प्रयत्नशील होत्या. पेंटींग, मणीकाम, विणकाम एम्ब्रायडरी इ. हस्तकलामध्ये त्यांचा हातखंडा होता. यासाठी त्यांना अनेक राज्यस्तरीय पारितोषिके मिळालेली आहेत. त्या आपल्या राजवाड्यामध्ये गंजिफा, पेंटिंग इ. हस्तकलांमध्ये मग्न असत. तसेच त्या इतर हस्तकलाकारांना मार्गदर्शन व सहकार्य करीत.

## राजेसाहेब श्रीमंत खेमसावंत भोंसले
## तहयात अध्यक्ष - सिं. जि. शि. प्र. मंडळ, सावंतवाडी

श्रीमंत खेमसावंत भोंसले हे सावंतवाडीच्या राजघराण्यातले सहावे खेमसावंत राजे होते. त्यांचे पूर्व माध्यमिक शिक्षण उटी मुक्कामी झाल्यावर प्राथमिक - माध्यमिक शिक्षण त्यांनी सोंडूर येथे पुरे केले. श्री पंचम खेमराज महाविद्यालय सावंतवाडी मधून पदवीपूर्व विज्ञान परीक्षा विशेष प्राविण्यासह प्रथम वर्गात उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी सुरतकल (कर्नाटक) येथील अभियांत्रिकी कॉलेजमधून बी.टेक्.ही पदवी पहिल्या वर्गात संपादन केली.१९९५ मध्ये त्यांनी कायद्याची पदवी पहिल्या वर्गात संपादित केली.ते एक हुशार,खिलाडू व शिस्तप्रिय व्यक्ती म्हणून ओळखले जातात.व्यायाम,नेमबाजी,बॉडी बिल्डींग इत्यादी क्षेत्राबद्दल त्यांना विशेष आवड आहे.

## श्रीमंत सौ. शुभदादेवी खेमसावंत भोंसले
## चेअरमन व विश्वस्त -सिं. जि .शि. प्र.मंडळ,सावंतवाडी

त्यांनी जे.जे.स्कूल ऑफ आर्ट मधून इंटेरिअर डेकोरेशनचा अभ्यासक्रम पुर्ण केला. रोटरी एक्स्चेंज कार्यक्रमाकरिता १ वर्ष ऑस्ट्रेलियात वास्तव्य. मलेशिया, इंग्लड, अमेरिका, नेपाळ, दुबई इ.देशाचा प्रवास.कलाक्षेत्रात विशेष आवड. सावंतवाडी लॅकरवेअर्सच्या भागीदार आहेत.

## श्रीमंत युवराज लखमराजे भोंसले
## विश्वस्त व कार्यकारी सि. जि. शि. प्र. मं. सावंतवाडी

युवराज लखमराजेंचे प्राथमिक शिक्षण बेळगांव येथे तसेच त्यांनी आपले ज्युनिअर कॉलेजचे शिक्षण हसाराम रिझुमल महाविद्यालय चर्चगेट, मुंबई येथून पूर्ण केले. दादर, मुंबई येथून त्यांनी Indian Institute of Hotel Managment मधून पदवी संपादन केली. त्यानंतर Cullinary Institute of America मधून बेकिंग आणि पेस्ट्री ची २ वर्षाची असोशिएट Degree घेतली आहे.

## श्रीमंत युवराज्ञी उर्वशीराजे भोंसले
## विश्वस्ता

युवराज्ञी उर्वशीराजेचे प्राथमिक शिक्षण जोझोपस कॉन्व्हेंट्स पाचगणी येथून झाले असून त्यांचे ११ वी १२ वीचे शिक्षण जोती निवास बेंगलोर येथे झाले आहे. त्यांनी बॅचलर ऑफ अकौन्टींग ॲण्ड फायनांन्स ही पदवी हासाराम रिझुमल महाविद्यालय चर्चगेट, मुंबई येथून पूर्ण केले आहे. तसेच त्यांनी मास्टर इन कार्बन फायनांन्सचे पदव्यत्तर शिक्षण एडीनबर्ग विद्यापीठ स्कॉटलंड येथून पुर्ण केले आहे.

## महाविद्यालयचा संक्षिप्त परिचय

गोरगरीबांच्या मुलामुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळावी,या उद्देशाने सन १९६१ साली हि.हा.शिवरामराजे भोंसले यांनी हे महाविद्यालय केवळ १०० विद्यार्थ्यांवर सुरू केले. आज या महाविद्यालयात २००० विद्यार्थी कला,वाणिज्य तसेच विज्ञान,पदवी व पदव्युत्तर विभागात शिक्षण घेत आहेत.आज हे महाविद्यालय संपूर्ण कोकणात एक आदर्श,दर्जेदार व शिस्तप्रिय महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या महाविद्यालयात जाणीव पुर्वक प्रयत्न केले जातात.

राष्ट्रीय मुल्यमापन व अधिस्विकृती परिषद (नॅक ) बेंगलोर या राष्ट्रीय संस्थेकडे नोव्हेंबर २०११ मध्ये महाविद्यालयाचे पुनरमुल्यांकन झाले. या नॅक परिषदेकडून महाविद्यालयाला (बी) मानांकनाचा दर्जा प्रदान करण्यात आला. तसेच महाविद्यालयास २००५-०६ साली मुंबई विद्यापीठाने "बेस्ट कॉलेज" म्हणून गौरवीले आहे. सन २०१९ मध्ये महाविद्यालयाला नॅक पुनरमुल्यांकना मध्ये ए मानांकन ३.०६ सी.जी.पी.ए. सह प्राप्त झाले आहे.

चालू शैक्षणिक वर्षासाठी खालील अभ्यासक्रमांना प्रवेश देण्याचे काम वेळापत्रकानुसार जाहीर केलेल्या तारखांपासून सुरू होईल.

### अभ्यासक्रम

**अकरावी/बारावी - कला व वाणिज्य**

**अकरावी/बारावी - कला (संयुक्त तुकडी)(माध्यम-मराठी व इंग्रजी)**

**आवश्यक विषय-** १. इंग्रजी २. पर्यावरणशास्त्र ३ **शारिरीक शिक्षण**
४) अर्थशास्त्र ५) **भूगोल** ६) समाजशास्त्र ७) मानसशास्त्र

**वैकल्पिक विषय** १. मराठी/हिंदी

## XI^th^ & XII^th^ Commerce ( Medium English & Marathi )

**Compulsory Subjects-**

1) English

2) Environmental Science
3) Physical Education
4) Economics
5) Book keeping & Accountancy
6) Organisation & Commerce

**Optional subjects-**

1) Marathi / Hindi / Information Technology
2) Co-operation / Geography

**XIth & XIIth Science**
**( Medium English & Marathi)**
**Compulsory Subjects-**

1) English 2) Physics 3) Chemistry
4) Environmental Science 5) Physical Education

**Optional subjects-**

1) Marathi / Information Technology
2) Technical A-1 / Technical A-3 /
3) Technical A-1 (Electrical Maintenance), Mathematics
4) Technical A-3 (Scooter & Motercycle), Mathematics
5) Biology, Mathematics
6) Biology, Geography
7) Geography, Mathematics

**कार्यालयीन वेळ....**

**कार्यालयीन कामकाजाची वेळ :** सकाळी ९.५० ते ५.३०

**पैशाची देवघेव वेळ :** सकाळी १०.३० ते दुपारी १.३०

टिप- दुपारी १.३० ते २.०० पर्यंत भोजनाची सुट्टी राहील.

**वर्गवेळा....**

कला व वाणिज्य संयुक्त तुकड्या व शाखा विज्ञान ( अकरावी व बारावी ) सकाळच्या सत्रात सुरू असतात. (सकाळी वेळ ७.२० ते १.४५)

**प्रवेश....**

प्रवेश अर्जासोबत पुढीलप्रमाणे दाखले जोडावेत.

१) इ.१० वी व ११ वी परीक्षेत उत्तीर्ण असल्याचे मुळ गुणपत्रक व त्याची एक प्रत.

२) शाळा सोडल्याचा दाखला व त्याची एक प्रत.

३) इ.बी.सी.सवलत मिळविण्यासाठी करावयाचा अर्ज उत्पन्नाच्या दाखल्यासह दोन प्रतीत.

(अधिक माहीती इ.बी.सी.फी माफीच्या अर्जा बाबतची माहिती या भागात दिली आहे.)

४)प्रवेश घेणारी व्यक्ती मुलगी असल्यास प्रतिज्ञापत्र दोन प्रतीत द्यावेत, व रेशनिंग कार्डची छायांकित प्रत जोडावी.

**सुचना...**

१) इतर राज्यातून माध्यमिक अगर तत्सम परीक्षा उतीर्ण होऊन या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्याशी संपर्क साधावा.

२) ११ वी विज्ञान या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस शालांत परीक्षेत (एस् एस् सी ) विज्ञान विषयात कमीत कमी ३५%गुण आवश्यक आहेत.

३) एकदा प्रवेश घेतल्यावर शाखा किंवा विषय बदलता येणार नाही.विशिष्ट परिस्थितीत शाखा व विषय बदलून देण्याचा अधिकार मा.प्राचार्यांना राहील.

४) ज्या विद्यार्थ्यांचे व पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.२५००००/- पेक्षा कमी असेल ते विद्यार्थी इ.बी.सी.फी सवलतीसाठी अर्ज करावयास पात्र आहेत

**इ.बी.सी. फी माफीच्या अर्जाबाबतची माहिती....**

१) हा फी माफीचा अर्ज वडीलांनी करावयाचा आहे.ते हयात नसल्यास आईने,आई-वडील हयात नसल्यास पालकाने आणि पालक नसल्यास स्वत:स्वावलंबी विद्यार्थ्याने करावयाचा आहे व त्या प्रमाणे अर्जात माहिती नमूद केली पाहिजे.वडील,आई किंवा पालक नोकरीत असल्यास ज्या ठिकाणी नोकरीस आहेत तेथील पगाराचा ऑफिस प्रमुखाचा दाखला पाहिजे.उत्पन्नाच्या दाखल्यावर तहसीलदाराची सही हवी.

२) इ.बी.सी.साठी अर्ज केला म्हणजे सवलत मिळाली असे नव्हे तर मा.शिक्षणाधिकाऱ्यांनी अंतिम मंजूरी दिल्यावर सवलत मिळू शकते. असा अर्ज शिक्षणाधिकाऱ्यांनी कोणत्याही सबबीवर नामंजूर केल्यास संपूर्ण फी भरावी लागते.

३) ज्या विद्यार्थ्यांचे आई व वडील प्राथमिक/माध्यमिक /उच्च माध्यमिक शिक्षक अगर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक/शिक्षकेत्तर असतील त्या विद्यार्थ्याने त्याला मिळणाऱ्या फी सवलतीचा अर्ज ( दोन प्रतीत )करावा.

४) जो विद्यार्थी मागासवर्गीय असेल त्या विद्यार्थ्याने जातीचा दाखला (दोन प्रती)जोडावा.

५) रेशनकार्ड झेरॉक्स (दोन प्रती) सदरची सवलत दोन अपत्यांपर्यंत अनुज्ञेय.

६) प्रतिज्ञा पत्रे दोन प्रतीत जोडावीत.

७) विद्यार्थी/पालक यांच्या कडे खालीलपैकी एक वा अधिक गोष्टी असल्यास शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/२००२/ इ.बी.सी./१५५/पी.आर./मवी -१ दि.१७/०६/२००२ नुसार विद्यार्थी इ.बी.सी.सवलत मिळण्यास अपात्र ठरतात.१) स्वत:चे

घर अगर बंगला २) मोबाईल फोन ३)बागायती शेती ४) मोटार किंवा मोटार सायकल ५) फ्रीज ६)टेलिफोन ७)ट्रॅक्टर ८) वॉशिंग मशिन ९) म्युझिक सिस्टीम १०) मिक्सर फुड प्रोसेसर ११)ए.सी. त्याचप्रमाणे विद्यार्थी खाजगी शिकवणी वर्गामध्ये प्रविष्ठ झालेले आढळल्यास इ.बी.सी मिळण्यास पात्र असणार नाही.वर नमूद केलेली माहिती विहित नमुन्यात इ.बी.सी.अर्जासोबत जोडून द्यावयाची आहे.सदर माहिती खोटी आढळल्यास विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष वाया जाईल याची नोंद घेणे आवश्यक आहे.

**भारत सरकार शिष्यवृत्ती योजना....**

* एस सी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २,००,०००/- एवढे आहे.

* एन.टी.व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १,००,०००/- एवढे आहे.

तसेच वरील प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २,००,०००/- किंवा १,००,०००/- पेक्षा जास्त आहे तो विद्यार्थी भारत सरकार फ्री शिप शिष्यवृत्ती योजनेस प्राप्त ठरतील.पण त्यासाठीही शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे अनिवार्य आहे.

**१) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय )**

**उद्देश** – मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे या उद्देशाने शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजनेखाली विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येते.सदर योजना अनूसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती ,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना लागू आहे.

*** नियम /अटी व पात्रता**

१) विद्यार्थी शालांत परिक्षोत्तर अभ्यासक्रमात प्रवेश न घेतलेला नसावा.

२) विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.१,००,०००/-चे आत असावे.

३) विद्यार्थी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या विमूक्त जाती-भटक्या जमाती ,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्गाचा असावा.

४) विद्यार्थी पूर्ण वेळेत नोकरीत नसावा.

५) विद्यार्थी शिकत असलेल्या अभ्यासक्रमास सक्षम विद्यापीठाची / बोर्डाची मान्यता असणे आवश्यक आहे.

***अर्ज करण्याची पध्दत**

१) अर्जदाराने शिष्यवृत्तीचा अर्ज खालील संकेत स्थळावर ऑनलाईन मार्फत भरून महाविद्यालयाकडे सादर करावा (www.mahaschol.maharashtra.gov.in)

२) विद्यार्थ्याचे स्वत:च्या नावे असलेले खाते बँक ऑफ इंडिया,सावंतवाडी शाखेत असणे आवश्यक आहे.

३) द्वितीय / तृतीय वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्राचे नूतनीकरणाचे अर्ज भरून न देता अशा विद्यार्थ्यांची माहिती विवरण पत्रामध्ये महाविद्यालयाने भरावयाचे असून विवरण पत्र **'अ'** प्राचार्यानी साक्षाकित करावे.

४) अर्जासोबत मागील वर्षाचे उत्तीर्ण झालेबाबतचे गुणपत्रक जोडावे.

५) शिक्षणात खंड पडलेला असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे (Gap Court Affidavite) शपथ पत्र जोडावे.

६) जातीचा दाखला तहसिलदार सक्षम अधिकाऱ्याचा असावा. ( सदर दाखला खाडाखोड केलेला अथवा शंकास्पद नसावा. )

७) उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिकाऱ्याचा असावा.विद्यार्थ्याचे पालक नोकरी करत असतील तर त्याच्या एकूण उत्पन्नाचा दाखला (उदा.मूळ वेतन,महागाई भत्ता,स्थानिक पूरक भत्ता,प्रवास भत्ता व इतर भत्ते यांचा पुर्ण तपशिल )असणे आवश्यक आहे.

८) ज्या विद्यार्थ्यांचे पालक शेती अगर इतर धंदा करीत असतील तर त्यांनी मा. तहसीलदार यांच्याकडून उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

९) विद्यार्थीनीच्या बाबतीत (मुलीचे )लग्न झाले असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला, जोडणे आवश्यक आहे.

१०) वडील हयात नसल्यास वडीलांचा मृत्यू दाखला जोडणे आवश्यक आहे.

११) विद्यार्थी पर जिल्ह्यातून शिक्षणासाठी आला असल्यास जिल्ह्याबदल

प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे त्यामध्ये मागील वर्षी घेतलेली शिष्यवृत्ती मंजूरी क्रमांक व दिनांक व रक्कम नमुद करावी.

कनिष्ठ महाविद्यालयात योग्यता प्रमाणपत्र (Provisional Eiligbility Certificate)

महाराष्ट्राबाहेरील किंवा परदेशातून आलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देताना योग्यता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी खालील गोष्टींची पुर्तता

करणे आवश्यक आहे.

* योग्यता प्रमाणपत्र मागणी अर्ज शुल्क भारतीय विद्यार्थ्यांसाठी रू.१०० व परदेशी विद्यार्थ्यांसाठी शुल्क रू.५००/-सदरचा अर्ज विभागीय सचिव,कोकण,विभागीय मंडळ,रत्नागिरी यांच्या कार्यालयात मिळतील.

*परराज्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्यता प्रमाणपत्र शुल्क रू.३००/-व परदेशातील विद्यार्थ्यांना रू.५००/- शुल्क आकारण्यात येणार आहे. यासाठी खालील कागदपत्रांची आवश्यकता आहे.

अकरावी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांने इ.१० चे मुळ गुणपत्रिका प्रमाणपत्र व प्रमाणित झेरॉक्स प्रत शाळा सोडल्याचा/ट्रान्सफर सर्टीफिकेट (मूळ दाखला) ची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत जोडावी. मूळ मायग्रेशन सर्टीफिकेट व प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत .इ. १२वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १० वी प्रमाणपत्र व ११ वी चे मुळ गुणपत्रक व मायग्रेशन / शाळा सोडल्याचा दाखला /ट्रान्सफर सर्टीफिकेट मुळ प्रत व प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत शाळा सोडल्याच्या दाखल्यावर संबंधीत शिक्षणाधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. हमी पत्र रू.२० च्या स्टॅम्प पेपरवर घ्यावे लागते.

१२) विद्यार्थी खाजगी किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृह रेक्टरचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रमाणपत्रामध्ये वसतिगृहात प्रवेश घेतल्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.

**विशेष सुचना**

१) अभ्यासक्रमामध्ये समावेश असलेल्या कोणत्याही सहलीशिवाय कोणतीही सहल काढली जाणार नाही.

२) प्रत्येक विद्यार्थ्याजवळ महाविद्यालयीन ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

३)सर्व वर्गपाठांना वेळापत्रकाप्रमाणे उपस्थित राहणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांने आपले वर्गपाठाचे,परिक्षांचे गुण व अभ्यासातील प्रगती आपल्या पालकांना वेळोवेळी कळविली पाहीजे.पालकांनी याबाबत महाविद्यालयास जबाबदार धरु नये.महाविद्यालयाकडे चौकशी केल्यास विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबाबत माहिती पुरविली जाईल.

४) दरसत्रामध्ये वर्गपाठ व अभ्यासपाठ यांची किमान उपस्थिती ७५% नसल्यास विद्यार्थ्याचे सत्र मंजूर होणार नाही.म्हणून पालकांनी विद्यार्थ्यांच्या हजेरीकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.

५)इ.बी.सी.किंवा बी.सी.फी सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी समाधानकारक नसल्यास त्याला मिळणारी फी सवलत बंद होऊन संपूर्ण फी भरावी लागेल.

६) सर्व सवलतींविषयी तपशीलवार माहिती त्या त्या वेळी सुचना फलकावर लावली जाते.त्यासाठी विद्यार्थ्यांनी नियमितपणे सुचना फलक वाचण्याची सवय ठेवावी.

७)प्रवेश अर्जामध्ये दिलेल्या घरच्या पत्त्यावर दिर्घ मुदतीच्या सुट्टीवर जाण्यासाठी एस.टी.सवलत मिळते.

८) विद्यार्थ्यांनी फी च्या पावत्या जपून ठेवाव्यात.पावती नसल्यास फी विषयी कोणतीही तक्रार विचारात घेता येणार नाही.

९) विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल वापरण्यास सक्तमनाई आहे. मोबाईल आढळल्यास सदर विद्यार्थ्यांवर कडक कार्यवाही करण्यात येईल.

**इयत्ता १० वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनूसूचित वि.जा.भ.ज.जातीच्या मुला-मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता**

## शिष्यवृत्तीयोजना :-

### उद्दिष्ट, व स्वरूप

इयत्ता १० वी ची परीक्षा ७५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या व इ.११ वी व १२ वी मध्ये शिकत असलेल्या जाती,वि.जा.भ.ज.,विमाप्र,मुलामुलींना राजर्षी छत्रपती योजनेचा लाभ घेता येतो.

### अटी व शर्ती

इ.१०वी चे परीक्षेत ७५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल.

### शिष्यवृत्ती प्रदान

ही शिष्यवृत्ती दोन वर्षाकरिता दहा महिन्यासाठी खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) इयत्ता ११ वी | रू.३००/-दरमहा | १०महिन्याकरिता |
| ब) इयत्ता १२ वी | रू.३००/-दरमहा | १०महिन्याकरिता |

### अर्ज भरण्याची पध्दत

१)शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी इ.११ वी मध्ये कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे विहित नमुन्यात जून अखेर पर्यंत अर्ज करावा.

२) संबंधित महाविद्यालयाने शिष्यवृत्ती वाटप केल्याचे विनियोग दाखले हे पुढील वर्षाचे प्रस्ताव सादर करताना संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांने देणे बंधनकारक राहील.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | जात व पोटजात शाळेच्या रेकॉर्ड नुसार | इयत्ता व शाखा | दहावीतील गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

उपरोक्त माहिती सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.

१) विद्यार्थ्यांस सक्षम अधिकाऱ्यानी दिलेले जातीचे प्रमाणपत्र

२) विद्यार्थ्याची दहावीची गुणपत्रिका

३) विद्यार्थ्याची शाळा सोडल्याचा दाखल्याची प्रत.

४) विद्यार्थ्याच्या महाविद्यालयात प्रवेश घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या छायांकित प्रतिसह प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**संपर्क :-** १.विद्यार्थ्याने सबंधित शैक्षणिक संस्था प्रमुखाकडे

२.संस्था प्रमुखाने सबंधित विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे सादर करावा.

**गुणवत्ता शिष्यवृत्ती /प्रस्ताव /२००६-२००७ /१५३१ दि.१७/२/२००७**

इयत्ता १० वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित वि.जा.भ.ज.जातीच्या मुला-मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदानाबाबत उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने व संदर्भ क्र.१ च्या आदेशान्वये इयत्ता १० वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून ७५% पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या इ.११ वी / १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती, वि.जा.भा.ज., विमाप्र, मुलामुलींना रू.३००/-प्रमाणे १० महिन्याकरिता राजर्षी छत्रपती शिवाजी महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती या कार्यालयाकडून मंजूर केली जाते.त्यासाठी सदर प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केले जातात.तसेच प्रस्ताव ११ वी मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त झालेली आहे व सदर विद्यार्थी १२ वी मध्ये शिकत आहे.अशा अनूसूचित जाती/वि.जा.भ.ज.,विमाप्र/वर्गाच्या मुला-मुलींना राजर्षी छत्रपती शिवाजी महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करता येतो.

## नियमावली

१) महाविदयालयाच्या आवारातील स्थावर जंगम मालमत्तेची नासधूस करणे अक्षम्य व दंडनीय आहे.

२) महाविदयालयात प्रवेश घेताना एखादा विद्यार्थी नोकरी वा उद्योगधंदा अथवा या स्वरूपाचे काही काम करत असल्यास त्या विषयीचा सारा तपशिल (वेतन, मोबदला, कामाची वेळ इ.) प्रवेश अर्जात नमुद करणे आवश्यक आहे. नोकरी करत असणाऱ्या विद्यार्थ्यांने आपल्या वरिष्ठांकडून अनुमती पत्र घेवून, ते प्रवेश अर्जासोबत सादर करणे

आवश्यक आहे

३) महाविदयालयामध्ये प्रवेश घेतल्यानंतर एखाद्या विद्यार्थ्याने नोकरी स्विकारल्यास वा व्यवसाय सुरू केल्यास त्या संबंधी माहिती १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात मा.प्राचार्यांना कळविणे आवश्यक आहे. वरील बाबींबद्दल उल्लंघन केल्यास त्या विद्यार्थ्याचा महाविदयालयीन प्रवेश रद्द करण्याचा अधिकार मा.प्राचार्यांना राहिल.

४) विद्यार्थ्याने महाविदयालयाच्या वा संस्थेच्या संदर्भात कोणतेही लिखाण प्रसिद्ध करण्यापूर्वी मा.प्राचार्याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.याबाबत एखाद्या विद्यार्थ्याने उल्लंघन केल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्याचा व त्यास योग्य दंड करण्याचा अधिकार मा.प्राचार्यांना राहील.

५) महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेला बाधा पोहचेल असे कोणतेही गैरवर्तन एखाद्या विद्यार्थ्याकडून घडल्यास योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार मा.प्राचार्यांना राहील.

६) दरवर्षी प्रयोगशाळेचे ब्रेकेज भरावे लागेल.

७) विद्यार्थी आपली तासिका चुकवून आवारात फिरत असेल अथवा जिमखान्यात खेळत असेल तर त्यावर कार्यवाही करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

८) विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या आवारात व वर्गात स्वत:च्या गळ्यात ओळखपत्रे घालणे अनिवार्य आहे.

(**गैरवर्तन**–प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थी यांच्याशी उध्दट व अपमानकारक वर्तन करणे, महाविद्यालयाबाबत बदनामीकारक मजकूर प्रकाशित वा प्रसारित करणे, इमारत व मालमत्तेची नासधूस करणे,महाविद्यालयाच्या शिस्तीचे उल्लंघन वगैरे गैरवर्तन समजण्यात येईल.)

## ग्रंथालय

१) ग्रंथालयामध्ये क्रमिक आणि इतर वाचनासाठी लागणारी संदर्भ पुस्तके, नियतकालिके यांची सोय केलेली आहे. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका आहे. तिचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा.

२) ग्रंथालयीन पुस्तके ही महाविद्यालयाची बहुमोल संपत्ती असून ती नीट वापरणे,खराब न करणे एवढेच नव्हे तर दुसरा कोणी करत असल्यास त्याला त्यापासून परावृत्त करणे

हे आपले कर्तव्य आहे.

३) ग्रंथालयाच्या अभ्यासिकेत बसून वाचण्यासाठी कोणतेही पुस्तक,मासिक वा प्रश्नपत्रिका संच मिळेल. त्याच्यासाठी ओळखपत्र आवश्यक आहे.कोणालाही त्याशिवाय पुस्तके मिळणार नाहीत.अभ्यासिकेत देण्यात येणारे ओळखपत्रकावरील पुस्तक परवानगी शिवाय बाहेर नेता येणार नाही.तसे केल्यास संबधित विद्यार्थ्याला रू.५/-प्रमाणे दंड आकारला जाईल. पुढे त्याने ते पुस्तक काही दिवसानी परत केल्यास दर दिवशी रू ५/-प्रमाणे दंड आकारला जाईल.

४) विद्यार्थ्याला घरी वाचण्यासाठी पुस्तके हवी असल्यास ती मिळतील पण त्यासाठी त्याच्याकडे बॉरोअर तिकिट असणे आवश्यक आहे. पुस्तक फक्त ७ दिवस घरी ठेवता येईल. त्यानंतर लगेच पुस्तक परत न केल्यास दरदिवशी रू.१/- प्रमाणे १ आठवडा व पुढे दर दिवशी रु.२/-प्रमाणे विलंब शुल्क आकारला जाईल. सतत तीन आठवड्याहून अधिक काळ एखाद्या विद्यार्थ्याने पुस्तक परत नाही केले तर त्याचे बॉरोअर तिकिट रद्द करण्यात येईल.

५) पुस्तकपेढी योजनेतुन गरीब,होतकरु,हुषार विद्यार्थ्यांना वर्षभर वापरासाठी मोफत पुस्तके पुरविण्यात येतात.

६) वार्षिक परीक्षा संपताच सर्व पुस्तके आठ दिवसाच्या आत परत करावीत.

७) एखादे पुस्तक खराब आढळल्यास शेवटी ज्या विद्यार्थ्याने ते पुस्तक घेतले असेल त्याला त्याबाबत जबाबदार धरले जाईल.म्हणून प्रत्येक पुस्तक घेताना तपासून घ्यावे.ते पूर्ण आहे,नीट आहे याची पक्की खात्री करून घ्यावी.ते खराब झाले असल्यास लगेच देवघेव विभागातील लिपीकाच्या निदर्शनास आणावे.

८) विद्यार्थ्याने विद्यार्थी सहाय्यक निधीतून पुस्तक रूपाने मदत दिली जाते. यासाठी अधिक माहीतीसाठी ग्रंथालयात चौकशी करावी.

९) विलंब शुल्क अथवा ग्रंथालयातून आकारला जाणारा इतर कोणताही दंड कार्यालयात भरून त्याची पावती दाखविल्याशिवाय पुस्तकाची देवाणघेवाण करण्याची परवानगी दिली जाणार नाही.विशिष्ट परीस्थितीत हा नियम शिथील करण्यात येईल

१०) ग्रंथालयात येताना ओळखपत्र आवश्यक आहे.येथील कर्मचाऱ्याकडून त्याची

मागणी केल्यावर विद्यार्थ्याने ते न दाखविल्यास त्याला ग्रंथालयात प्रवेश मिळणार नाही.

**जिमखाना / जिमनॅशियम....**

क्रीडा विभागात अनेक देशी विदेशी खेळांची सोय केलेली आहे.तसेच व्यायाम खेळ वगैरे मार्गदर्शन उपलब्ध आहे.विशेष क्रीडा नैपुण्य दाखविणाऱ्याना फी नादारी तसेच आर्थिक सवलती वा सहाय्यासाठी विचार केला जाणे.

**विद्यार्थी सहकार भांडार....**

या भांडारात स्टेशनरी, निरनिराळे फॉर्म, ट्यूटोरीयलसाठी वह्या, जर्नल्स, पुस्तके, प्रकल्पवही इ. शिक्षणोपयोगी साहित्य मिळेल. प्रत्येक विद्याथ्याने या भांडाराचा पाच रूपयाचा एक शेअर घ्यावा.प्रत्येक शेअर वर फायद्याप्रमाणे वर्षाच्या शेवटी डीव्हीडंड मिळेल.महाविद्यालय सोडताना आपला शेअर दुसऱ्याच्या नावावर वर्ग करता येईल.

**शिष्यवृत्ती व फी सवलती....**

१)भारत सरकाच्या तसेच राज्यसरकारच्या सर्व शिष्यवृत्या महाविद्यालयात देण्यात येतात.त्या बाबतची माहीती कार्यालयामध्ये मिळू शकते.

२)अपंग मुलांना सिव्हील सर्जनचा अपंगत्वविषयीचा दाखला अर्जासोबत जोडल्यास शिष्यवृत्ती मिळेल.

३) SC/ST/OBC/NT/VJNT/SBC विद्यार्थ्यासाठी तसेच मागास जाती जमातीतील मुलांना शिष्यवृत्ती मिळेल. याकरिता २०ऑगस्टपूर्वी पूर्ण अर्ज भरून सादर करावेत.

४) प्राथमिक,माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर मुलांसाठी फी माफी सवलत आहे.

५) लष्करात नोकरी करणाऱ्यांच्या मुलांना डी.एस.बोर्डाचा दाखला जोडल्यास फी सवलत मिळते.

६)स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळते.

शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती व इतर सवलतीविषयी कार्यालयातून माहिती मिळु शकेल.

**नुतनीकरण....**

कोणतीही शिष्यवृत्ती अगर फी मिळत असेल अशा विद्यार्थ्याने दरवर्षी तिचे नूतनीकरण करून घेणे आवश्यक असते.याबाबतची माहिती कार्यालयात मिळु शकेल.

**महाविद्यालयाकडून मिळणारी फी सवलत ....**

या फी सवलतीसाठी दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत ठराविक नमुन्यात अर्ज द्यावा.

अर्ज नमुना विद्यार्थी ग्राहक भांडारात मिळतो त्यासोबत आपल्या कुटूंबाचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला जोडवा.ही सवलत मिळण्यास एकूण रुपये २०,०००/- पर्यंत उत्पन्न मर्यादा निश्चीत केली आहे.

कोणतीही शिष्यवृत्ती मिळत असल्यास ही फी सवलत त्या विद्यार्थ्यास मिळणार नाही.ही सवलत अध्यापन फी मध्येच मिळते.ही दोन सत्रात विभागुन देण्यात येईल.यातुन लायक,होतकरू विद्यार्थ्यांना पुस्तके,स्टेशनरी,परीक्षा फी वगैरेसाठी सहाय्य देण्यात येते.याकरिता पहिल्या सहामाहीत आणि दुसऱ्या सत्रात ठराविक नमुन्यात विद्यार्थ्यांनी प्राचार्याकडे अर्ज करावा.

**सहामाही व पूर्व परीक्षा....**

अकरावी व बारावी वर्गाच्या सहामही परीक्षा घेण्यात येतील.बारावी वर्गाच्या पूर्व परीक्षा घेतली जाते. या परिक्षेसाठी प्रश्नपत्रिकांसाठी वेगळी फी.अकरावीसाठी रु.१३०/- व बारावीसाठी रू.१५०/-आकारण्यात येईल.वेळोवेळी अभ्यास (ट्युटोरीयल) आणि चाचण्या (टेस्ट) घेण्यात येतील.

**इयत्ता ११ वी साठी सर्व विषयांसाठी मुल्यमापन योजना खालीलप्रमाणे राहील**

१)अ) प्रथम सत्र अंतर्गत मूल्यमापन =२५ गुण, (ट्यूटोरियल /एमसीक्यू चाचणी/ चाचणी/सेमिनार इ.) ब) प्रथम सत्र लेखी परिक्षा ५० गुण .क) व्दितीय सत्र अंतर्गत मूल्यमापन= २५ गुण, (ट्यूटोरियल /एमसीक्यू चाचणी/चाचणी/सेमिनार इ.) ड)अंतिम लेखी परीक्षा (व्दितीय सत्राच्या शेवटी )=१०० गुण ( विज्ञान विषयासाठी

७० गुण लेखी व ३०गुण प्रात्यक्षिक व प्रकल्पासाठी आणि गणित व इतर विषयांसाठी ८० गुण लेखी व २०गुण प्रात्यक्षिकासाठी राहतील.)

$$\text{सरासरी निकाल} = \frac{२५+५०+२५+१००}{२} = \frac{२००}{२} = १००$$

इ) गणित व विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयांमध्ये उत्तीर्णतेसाठी आवश्यक असलेल्या ३५% गुणांमध्ये लेखी परिक्षेत (सहामाही परीक्षा व वार्षिक परीक्षा ) किमान २५% गुण प्राप्त होणे आवश्यक आहे. २)जर एखाद्या विद्यार्थी आजारपणामुळे परिक्षेला बसु शकला नाही व त्याने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले किंवा जर एखादा विद्यार्थी अपरिहार्य कारणामुळे परीक्षेला बसू शकला नाही व त्याचा त्याबाबत खरोखर नाईलाज होता, हे जर तो त्याच्या पालकांसोबत येऊन मा. प्राचार्यांना पटवू शकला तर बारावी वर्गात प्रवेश देण्यासाठी त्याची पुन्हा परीक्षा घेण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना आहे.या परिक्षेसाठी त्याला जादा फी भरावी लागणार नाही.

## मुलींचे वसतीगृह....

महाविद्यालयाच्या परिसरात सुसज्ज असे मुलींचे वसतीगृह उभे करण्यात आले आहे.सर्व सुविधांनी युक्त अशा या वसतीगृहातील निवासाकरीता 'फर्स्ट कम फर्स्ट' या तत्वावर आधारीत प्रवेश दिला जातो. वसतिगृह ती सुविधाची गरज असणाऱ्या मुली अथवा त्यांच्या पालकांनी प्रवेशाकरीता प्राचार्यांशी त्वरीत संपर्क साधावा.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सूचना

मागासवर्गीय (अ.जा/अ.ज/वि.मा./भ . ज.) च्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी अध्यापन (ट्यूशन ) फी, जिमखाना फी, ग्रंथालय फी, (टर्म )फी, प्रयोगशाळा फी आकारण्यात येत नाही.

सदर फी च्या रकमेकरिता विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्तीचा फॉर्म भरतेवेळी उपरोल्लेखीत फी मिळविण्यासाठी मा.विशेष समाजकल्याण अधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे विहीत नमुन्यात व ठराविक मुदतीत फॉर्म भरणे आवश्यक आहे.मा.विशेष समाजकल्याण अधिकारी यांचेकडून मंजूर होऊन मिळालेल्या रक्कमेतून

फी रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम विद्यार्थ्यांना आदा करण्यात येईल.

जे विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेमुळे पात्र ठरत नाही, किंवा जे विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करणार नाहीत त्यांच्या कडून पूर्ण फी भरुन घेतली जाईल.

**अल्पसंख्यांक भुधारक:**

अल्पसंख्यांक समाज मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शीख व पारशी या समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या प्रवेश शुल्क, परीक्षा, शुल्क, शैक्षणिक शुल्क व देखभाल भत्ता मंजूर करण्यात येतो. अन्यत्र दुसरी कोणतीही शिष्यवृत्ती अथवा प्रशिक्षण विधावेतन (स्टायपेंड ) घेता येणार नाही. या शिष्यवृत्तीसाठी मागील अंतिम परीक्षेत ५० टक्के गुण असणेही बंधनकारक राहील. दारिद्र्य रेषेखालील उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. उत्पन्न मर्यादेच्या चढत्या क्रमाने पात्र, पात्र ठरविण्यात आलेल्या लाभार्थी संख्येच्या लाभार्थी विद्यार्थ्यांना असल्याची अट बंधनकारक राहील. ही शिष्यवृत्ती, दोन अपत्ये असलेल्या पालकांच्या पाल्यांनाच मिळते.

## कनिष्ठ महाविद्यालय वार्षिक फी

| वर्ग | प्रवेश फी | अध्यापन फी | सत्र फी | अनामत | | | विद्यार्थी सहाय्य निधी | प्रयोग फी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वसाधारण * | ग्रंथालय * | प्रयोगशाळा * | | | |
| अकरावी कला | १६ | १९२ | ३२ | १० | १० | - | २५ | - | २८५ |
| अकरावी वाणिज्य | १६ | १९२ | ३२ | १० | १० | - | २५ | - | २८५ |
| अकरावी विज्ञान | १६ | १९२ | ३२ | १० | १० | १५ | २५ | ७० | ३७० |
| बारावी कला | १८ | २१६ | ३६ | १० | १० | - | २५ | - | ३१५ |
| बारावी वाणिज्य | १८ | २१६ | ३६ | १० | १० | - | २५ | - | ३१५ |
| बारावी विज्ञान | १८ | २१६ | ३६ | १० | १० | १५ | २५ | ७० | ४०० |

सूचना:- १) *या खूणेखाली निर्देशलेली फी इ.बी.सी.विद्यार्थ्यांनी भरावयाची आहे.कला व वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी रु.२२५/- आणि शास्त्र विद्यार्थ्यांसाठी ३७५/- भरावयाची आहे.त्याची इतर फी महाविद्यालयाला सरकारकडुन मिळेल अनामत रक्कम एकदा महाविद्यालयात जमा केल्यावर महाविद्यालय सोडेपर्यंत पुन्हा मिळणार नाही.

२)फी भरणाऱ्या विदयार्थ्यांनी संपूर्ण फी भरावयाची आहे.

३)अकरावी वार्षिक परिक्षेसाठी परीक्षा फी रु.१३०/–आकारली जाईल.

४) Jr. Information Tec Fee Rs. 3400/-

## मान्यवरांचे अभिप्राय

अत्यंत सुंदर निसर्गाचे दर्शन घडविणारा परिसर लाभलेल्या श्री.पंचम खेमराज महाविद्यालयाची भेट आणि तीसुध्दा कै.श्री.पंचम खेमराज यांच्या जन्मशताब्दी वर्षात म्हणजे एक दुग्धशर्करा योगच होता.इथले सर्वांना बरोबर घेऊन जाणारे प्राचार्य कातकर व सर्व प्राध्यापक यांना जवळून पाहण्याचा योग आला. स्वच्छता, स्थायीभाव दिसला. आत्मियता जाणवली आणि विद्यार्थ्यांची जिज्ञासूवृत्ती प्रकर्षाने अनुभवली. महाविद्यालयाचे कार्ये असेच उत्तरोत्तर वाढत जावो, ही त्या जगतनियंत्यापाशी प्रार्थना ! सुखसमृध्दी लाभो. उत्तरोत्तर उत्कर्ष होवो !

**स्नेहलता देशमुख**
( कुलगुरू,मुंबई विद्यापीठ )
०३/०८/१९९६

प्रगल्भ, प्रगत आणि प्रज्ञावंत विचार रूजविणारे पुण्यश्लोक बापूसाहेब महाराजांच्या ६१ व्या पुण्यतीथी निमित्त निसर्ग सुंदर सावंतवाडीत येण्याचा योग आला आणि तिथे त्यांनी पेरलेल्या शिक्षण बिजाचा झालेला वटवृक्ष पाहण्याची संधी मिळाली. नजिकच्या भविष्यकाळात सावंतवाडी ही महाराष्ट्राच्या शिक्षण मुकूटातील एक हिरा होईल अशी खात्री वाटावी.असे तेथे वातावरण आहे.या संस्थेचा आणि त्याच बरोबर प्रदेशाचाही शैक्षणिक,सांस्कृतिक,भौतिक विकास होवो. ही शुभेच्छा !

**कुमार केतकर**
( संपादक, महाराष्ट्र-टाईम्स)
०४/०८/१९९८

१९६१ मध्ये सावंतवाडी सारख्या दुर्गम भागात स्व.राजेसाहेब शिवरामराजे भोंसले यांनी आपली मालमत्ता रोख रक्कम ७५,०००/- इतकी भरुन हे महाविद्यालय सुरु केले आणि म्हणूनच येथील सर्वसामान्य माणसाच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पसरला आणि त्याला अर्थार्जनाची संधी मिळाली.

**मा.पतंगरावजी कदम**
( कुलपती,भारतीय विद्यापीठ )
१३/०८/१९९८

■ पंचम खेमराज बापूसाहेब यांच्या पुण्य स्मृतीस वाहीलेले हे महाविद्यालय सर्वांग सुंदर कार्य करत आहे.विद्यार्थ्यांच्या प्रतिभेस प्रफुल्लीत करुन त्याचा सुगंध चौफेर फैलावण्यास हे महाविद्यालय मदत करित आहे.सर्वार्थाने हे ज्ञानमंदिर कला, साहित्य, क्रीडा व विज्ञान ह्या माध्यमातून अलौकिक नररत्न निर्माण करीत राहील असा विश्वास आहे.

**ॲड.रमाकांत खलप**
माजी केंद्रिय कायदा मंत्री
०४/०७/१९९९

■ सावंतवाडी हे महाविद्यालय विशिष्ट हेतू उराशी बाळगून शिवरामराजेंनी सुरु केले होते शिवरामराजेंनी सुरु केलेले ग्रामीण भागातील गोर-गरीब अडाणी शेतकरी, कामकऱ्यांचे हे आशास्थान आहे. आज शिक्षण क्षेत्रात सर्वत्र पसरलेल्या प्रदुषणापासुन सुरक्षित असे हे महाविद्यालय या भागास मुल्याधिष्ठीत शिक्षण देऊन नवीन पिढी तयार करीत आहे. या कार्यास शिक्षक, विद्यार्थी संस्थाचालक यांनी एकादिलाने काम करून शिवरामराजेंचा हा मौल्यवान वारसा जपला पाहिजे.

**रा.कृ.कणबरकर**
कुलगुरू,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापुर
१३/०८/१९९९

■ आज रोजी दक्षिण रत्नागिरी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस भेट देण्याचा योग आला.या संस्थेने शिक्षण दानाचे काम एक कर्तव्य बुध्दीने व आदर्श पध्दतीने चालविले आहे. नैसर्गिक परिसर लाभलेले हे महाविदयालय या विभागात तरुणांचे आशास्थान आहे. कै.बापूसाहेब महाराजांचे तत्वप्रणालीप्रमाणे ही शिक्षण संस्था पुढे जात आहे. हे पाहून मला आनंद वाटला.

**मा.आ.अजितराव घोरपडे**
पालकमंत्री,सिंधुदुर्ग
१३/०८/२००२

आज दि. ४ जुलै २००३ रोजी श्रीमंत बापूसाहेब यांच्या स्मृतीदिनी कॉलेजला भेट देण्याचा योग आला.पुण्यश्लोक बापूसाहेब महाराज आणि आदरणीय शिवरामराजे भोंसले यांचे समाजविकास आणि परिवर्तनाचे कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे.कॉलेजची प्रगती प्रशंसनीय आहे.त्यांच्या सगळ्या प्रयत्नांना विद्यापीठ नेहमीच प्रोत्साहन देईल.असे मी आश्वासन देतो.या विद्यालयास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**मा.डॉ.भालचंद्र मुणगेकर**
कुलगुरू,मुंबई विद्यापीठ
०४/०७/२००३

It is a special previlage to be able to tour such a high quality college,It is especially nice to meet college collegues in another country who are dedicated to the education of their student.

Prof. Mary A.Bornnan
U.S.A. 4/11/04

श्री पंचम खेमराज तथा स्वर्गीय बापूसाहेब महाराज यांच्या ६८ व्या पुण्यतिथीनिमित्त सावंतवाडीला येणे झाले.येथिल सर्व वातावरण पाहून मनाला खूपच समाधान वाटलं त्यांनी चालवलेलं सत्कार्य त्यांच्या स्नुषा राजमाता श्रीमंत सत्वशीलादेवी भोंसले व त्यांचे नातू श्रीमंत खेमराज भोंसले (राजे)यांनी अत्यंत समाधानपूर्वक चालू ठेवले आहे.बापूसाहेबांचे चिरंजीव स्वर्गीय श्रीमंत शिवरामराजे (राजबहाद्दूर) यांचा माझा निकटचा संबंध. त्यांनी सुरू केलेली कार्ये आजपर्यंत त्यांच्या पश्चातही उत्तम प्रकारे चालू आहेत. श्री पंचम खेमराज महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत वाढ झाली व मी आल्याबद्दल माझा सत्कार केला गेला तसेच गुणवंत पारितोषिक सन्मान मिळवणारे यांचाही सत्कार करण्यात आला.हे सर्व पाहून मनाला खूप..... खूप बरं वाटलं बापूसाहेब महाराज यांनी प्रजेसाठी शिक्षित करण्याचा उचललेला वसा त्यांच्या पश्चातही त्यांच्या परिवाराने उत्तमप्रकारे चालू ठेवला पुढे ही असाच चालू रहावा हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

मा.उदयसिंगराव गायकवाड
माजी खासदार
०४/०७/२००५

वास्तविक संदेश देणे,अभिप्राय देणे यासाठी मी योग्य आहे असे मला वाटत नाही.मी इथे आलोय एका वारकऱ्याच्या श्रध्देने बापूसाहेब महाराज माझे दैवत त्यांची ७० वी पुण्यतिथी आज साजरी होत आहे आणि मी त्यासाठी इथे उपस्थित आहे.हे माझे महाभाग्य असे मानतो मी.आज हे महाविद्यालय बापूसाहेबांनी लावलेलं रोपटं फुललंय हे पाहून अत्यानंद झाला. शिवरामराजे, राजमाता सत्वशिलादेवी , राजेसाहेब खेमराज भोंसले यांचाही त्यांच्यात फार - मोठा वाटा आहे.

आत्माराम भेंडे

४ जुलै २००७

we learnt in school that no gem wull bush unseen,which holds true to the fabulous colleges you and your staff run
Being a students of mumbai with most of the students having their nose in the air, I feel humble by what sawantwadi has offer, not only but also boast.
Congratulation's !

**Abhay Shah**

Mumbai

22nd Aug 2007

आज ४ जुलै २००८ रोजी हि.हा.बापूसाहेब महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त द.र.जि.शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्री पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमास भेट देण्याचा योग आला. येथील शिक्षणाचा दर्जा उच्च आहे. या संस्थेमुळे कोकणातील सामाजिक परंपरा जपली गेली आहे. ही संस्था समाजाचा दीप-स्तंभ आहे.संस्थेने सर्व क्षेत्रात शैक्षणिक सुविधा निर्माण करावी.

आमदार अजितराव घोरपडे

४ जुलै २००८

डॉ.बाबासाहेब जयंतीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयास भेट देण्याचा योग आला.

राष्ट्रपिता महात्मा गांधीनी **'रामराजा'** म्हणून गौरविलेल्या पुण्यश्लोक पंचम खेमराज तथा बापूसाहेब महाराजांच्या नावाने १९६१ पासून कार्यरत असलेल्या या महाविद्यालयाचे शैक्षणिक योगदान कौतुकास्पद आहे.विविध अभ्यासक्रम, सुसज्ज प्रयोगशाळा,ग्रंथालय ही या महाविद्यालयाची बलस्थाने आहेत. महाविद्यालयाच्या वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

डॉ.राजन वेळुकर
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ
१४/५/२०११

प्रकाशक : **प्राचार्य डॉ.डी.एल.भारमल**
**श्री पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी**
फोन नं.०२३६३/२७२०१७

## बी. सी./ओ. बी.सी विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे निवेदन

मी,----------------------------

मागास/ इतरमागासवर्गीय विद्यार्थी असून या निवेदनाद्वारे लिहून देतो की,वेळोवेळी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डावर भारत सरकार शिष्यवृत्ती (बी.सी./ओ.बी.सी.) संदर्भात लावलेल्या सूचना पूर्ण वाचून त्याप्रमाणे शिष्यवृत्तीसाठी अंतिम तारखेपूर्वी मी अर्ज भरून न दिल्यास महाविद्यालयात भरावी लागणारी पूर्ण फी भरण्यास माझी किंवा माझ्या आई-वडिलांची कोणतीच तक्रार असणार नाही .

माझ्या पालकांचे नाव :-----------------------------------

-------------------------------------------असून त्यांचे

वार्षिक उत्पन्न----------------------आहे.

सही,

वडील/आई　　　　　　　　　　　　　विद्यार्थ्याची सही

# * शिक्षक वृंद *

| | |
|---|---|
| डॉ. डि. एल. भारमल | प्राचार्य |
| श्री. व्ही. पी. राठोड | इंग्रजी, एम.ए.,बी.एड.<br>कनिष्ठ महाविद्यालय समन्वयक |
| श्री. ए. एस. गवळी | रसायनशास्त्र, एम.एस्सी.,बी.एड. |
| श्री. एस. एस. खोत | भौतीकशास्त्र, एम.एस्सी.,बी.एड. |
| श्री. एम. व्ही. भिसे | मराठी,एम.ए.,बी.एड. |
| सौ. एम. एस. ठाणेकर | मानसशास्त्र , समाजशास्त्र, हिंदी एम.ए.,बी.एड. |
| सौ. के. पी. लोबो | वाणिज्य, एम.कॉम.,बी.एड. |
| सौ. पी. डी. सावंत | भूगोल, एम.ए.,बी.एड. |
| श्री. ए. ए. कांबळे | जीवशास्त्र, एम.एस्सी.,बी.एड.,डी.एस.एम |
| श्री. आर. एम. सावंत | गणित, एम.एस्सी.,बी.एड. |
| श्री. आर. बी. सावंत | रसायनशास्त्र, एम.ए.,बी.एड. |
| श्री. एम. व्ही. आठवले | सहकार, अर्थशास्त्र एम.ए.,बी.एड. |
| सौ. एस. पी. पराडकर | एम.सी.ए. |
| श्री. आर. आर. लंगावे | एम.सी.ए. |
| सौ. एस. पी. भाईप | हिंदी, एम.ए.,बी.एड. |

# एच.एस्.सी. फेब्रुवारी / मार्च २०२०
## बारावी कला, वाणिज्य व विज्ञान

### कला

| | |
|---|---|
| १. कु. धुरी मितल देवेंद्र | ९०.०० % |
| २. कु. राणे जान्हवी बाळकृष्ण | ८४.६१ % |
| ३. कु. परब वैष्णवी सच्चिदानंद | ८४.६१ % |
| ४. कु. ठोंबरे पार्थ विजय | ७८.३० % |

### वाणिज्य

| | |
|---|---|
| १. बक्षी प्राजक्ता मकरंद | ८६.७६ % |
| २. धुरी रुत्विक दिलीप | ८४.९२ % |
| ३. पवार निलम राजन | ८४.१५ % |

### विज्ञान

| | |
|---|---|
| १. गावडे सानिका संजय | ९०.६१ % |
| २. गावडे चिन्मय प्रदिप | ८९.२३ % |
| ३. पावसकर रुतिका राजेश | ८७.३८ % |



# एच.एस्.सी. फेब्रुवारी / मार्च २०२१
## बारावी कला, वाणिज्य व विज्ञान

### कला

| | |
|---|---|
| १. कु. सोनुर्लेकर प्रसन्ना प्रदिप | ९३.८३ % |
| २. कु. सावंत प्रियांका मिलिंद | ८७.५० % |
| ३. कु. कोकरे रेश्मा श्रीकांत | ७९.०० % |

### वाणिज्य

| | |
|---|---|
| १. कुसगांवकर रिद्धी श्रीराम | ८९.८३ % |
| २. माठेकर रोहित मनोज | ८९.१६ % |
| ३. शिरोडकर सिद्धी दिपक | ८६.१६ % |
| ४. शेख सुझान इम्तियाझ | ८६.१६ % |

### विज्ञान

| | |
|---|---|
| १. देसाई प्रथमेश राजेंद्र | ९३.६७ % |
| २. हरमलकर प्रद्युम्न दिपचंद्र | ८८.६७ % |
| ३. जंगले दिव्या जर्नादन | ८६.५० % |



# एच.एस्.सी. फेब्रुवारी / मार्च २०२२
# बारावी कला, वाणिज्य व विज्ञान

## कला

| | |
|---|---|
| १. सबनीस साक्षी नागेश | ९०.८३ % |
| २. भाट सानिया समीर | ८८.०० % |
| ३. गोम्स डोरोथी जोरजे | ८५.५० % |

## वाणिज्य

| | |
|---|---|
| १. निब्रे साई रविंद्र | ८९.८३ % |
| २. मसुरकर वेदांत दत्तप्रसाद | ८५.०० % |
| ३. साळगांवकर सोहम अनिल | ८४.०० % |

## विज्ञान

| | |
|---|---|
| १. कु. नाईक अपर्णा भिमसेन | ८९.३३ % |
| २. कु. सावंत रुद्रेश रविंद्र | ८७.५० % |
| ३. कु. नाईक मिताली रत्नाकर | ८०.५० % |






कु. प्रसन्ना प्रदिप परब राष्ट्रीय स्तरावर पॉवरलिफ्टींग स्पर्धेमध्ये सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल सत्कार करताना
सिं. जि. शि. प्र. मंडळाच्या चेअरमन ह. हा. श्रीमंत सौ. शुभदादेवी खेमसावंत भोंसले,
सोबत मंडळाचे संचालक प्रा. डी. टी. देसाई,
सदस्य - डॉ. सतीष सावंत, ॲड. शामराव सावंत, जयप्रकाश सावंत,
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एल. भारमल, समन्वयक श्री. व्हि. पी. राठोड.



महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करताना
सिं. जि. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष हि. हा. श्रीमंत खेमसावंत भोंसले (राजेसाहेब)
सोबत संस्थेचे सदस्य - डॉ. सतीष सावंत, जयप्रकाश सावंत,
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एल. भारमल, समन्वयक श्री. व्हि. पी. राठोड व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक



कु. अपर्णा भिमसेन नाईक, बारावी विज्ञान प्रथम क्रमांक (८९.३३%) सत्कार करताना
सि. जि. शि. प्रसारक मंडळाचे विश्वस्त युवराज लखमराजे सावंतभोंसले,
सोबत चेअरमन ह. हा. श्रीमंत सौ. शुभदादेवी खेमसावंत भोंसले, संस्थेचे
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एल. भारमल



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन करताना सिं. जि. शि. प्र. मंडळाच्या
चेअरमन ह. हा. श्रीमंत सौ. शुभदादेवी खेमसावंत भोंसले,
सोबत मंडळाचे संचालक प्रा. डी. टी. देसाई,
सदस्य - डॉ. सतीष सावंत, ॲड. शामराव सावंत, जयप्रकाश सावंत,
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एल. भारमल, समन्वयक श्री. व्हि. पी. राठोड.

सावंत आर्ट/९४२२०६५१६०